# विपश्यना

साधक मराठी

E-NEWS LETTER
वार्षिक शुल्क रु. ३०/
आजीवन शुल्क रु. ५००/

साधकांचे
मासिक प्रेरणा पत्र

बुद्धवर्ष 2565, भाद्रपद पौर्णिमा (ऑनलाइन), 20 सप्टेंबर, 2021, वर्ष 5, अंक 6

For Online Patrika in various Languages, visit : https://www.vridhamma.org/newsletters


## धम्मवाणी

अनिच्चा वत सङ्खारा, उप्पादवयधम्मिनो।
उप्पज्जित्वा निरुज्झन्ति, तेसं वूपसमो सुखो॥

*— सं.नि. सगाथावग्गपालि-186, परिनिब्बानसुत्तं*

खरोखर सर्व संस्कार अनित्यच तर आहेत. (उत्पन्न होणाऱ्या सर्व परिस्थिती, वस्तू, व्यक्ती अनित्यच तर आहेत.) उत्पन्न होणे आणि नष्ट होत जाणे हाच तर यांचा धर्म (स्वभाव) आहे. उत्पन्न होऊन नष्ट होता होता जेव्हा त्याचे पूर्णपणे उपशमन होत जाते. (पुन्हा उत्पन्न होण्याचा क्रम समाप्त होत जातो), त्याचेच नाव परमसुख आहे. (तेच निर्वाण सुख आहे.)

# पूज्य गुरुजींचा दृढ संकल्प



29 सप्टेंबरला पूज्य गुरुदेवांची 8वी पुण्यतिथी आहे. त्यांच्या गुणांचे आणि त्यांच्या कार्याचे स्मरण करून श्रद्धांजलि स्वरूप त्यांच्याद्वारे फेब्रुवारी 1971 मध्ये लिहिल्या गेलेल्या काही महत्त्वपूर्ण पत्रांचा उल्लेख इथे खूप आवश्यक वाटत आहे. भारतातील त्यांच्या प्रारंभिक धर्म चारिकेमध्ये मी निरंतर त्यांच्याबरोबर होतो. 19 जानेवारी 1971 ला जेव्हा सयाजी ऊ बा खिन दिवंगत झाल्याची तार मिळाली तेव्हा बोधगयाच्या बर्मी विहारामध्ये शिबिर चालू होते. तार तर मीच नेऊन त्यांना दिली परंतु उघडून पाहिली नव्हती. तार पाहताच गुरुजींचा चेहऱ्याचा असा रंग पाहून मी सुन्न झालो. मी तिथेच उभा होतो पण काही विचारायची हिम्मत होत नव्हती. काही वेळ शांत राहिल्यानंतर गुरुजींच्या तोंडून हे शब्द आले “लाईट निघून गेली”. मी तरीही काही समजलो नाही आणि त्यांच्याकडे एकटक पहात राहिलो, तेव्हा ते हळूच म्हणाले “सयाजी नाही राहिले”....

त्या शिबिराच्या सफल समापनानंतर 28 जानेवारी ते 7 फेब्रुवारी पर्यंत पूज्य गुरुजींनी तिथेच आपले स्वयं शिविर लावण्याचा निर्णय घेतला. ज्यात दहा दिवसांची त्यांची ही स्वयं साधना खूप महत्वपूर्ण आहे आणि धर्म बळ वाढवण्याची ऐतिहासिक घटना आहे. त्याच वेळी पूज्य गुरुजींनी हा दृढनिश्चय केला होता की आता त्यांचे शेष जीवन धर्म-प्रसाराच्या कामातच लागेल. त्यानंतर मुंबईला परतल्यावर त्यांनी तिथे 1 मार्च ते 21 एप्रिलपर्यंत लागोपाठ 4 शिबिरांचे संचालन केले.

त्याच वेळी पूज्य गुरुजींनी अजूनही काही महत्त्वपूर्ण कार्य करण्याचा संकल्प घेतला आणि अनेक अडचणी असून त्यांचे सफल संपादन केले, ज्याचे दूरगामी प्रतिफळ सद्धर्माच्या सर्वसुलभतेच्या रुपात आपल्या समोर उपस्थित आहे. त्यांचा हा निर्णय आज सद्धर्माच्या शुद्धतेला कायम ठेवण्याच्या क्षेत्रात अत्यंत महत्वाचा सिद्ध होत आहे. याच्याविषयी लिहिलेले खालील पत्र प्रमाण स्वरूप आहे जे त्यांच्या स्वतःच्या व्यक्तित्वाला सुद्धा उजागर करीत आहे. (सं)

### सयाजी ऊ बा खिन यांचा शरीर त्याग

ठिकाण : बोधगया

22 जानेवारी 1971

बाबू भैया, सादर प्रणाम!

ढगविरहित आकाशातून गडगडाटाप्रमाणे गुरुदेवांच्या शरीर त्यागाचा संवाद प्राप्त झाला. एक वेळ तर काही क्षण स्तब्ध झाल्या कारणाने वाटले की मी अनाथ झालो. परंतु दुसऱ्याच क्षणी प्रबळ वेगाने साऱ्या शरीरात अनित्य बोधाचे प्रवाह वाहू लागले. अगदी तसेच जसे पुज्य ताई( दत्तक घेणाऱ्या आई) च्या स्वर्गारोहणच्यावेळी आणि तसेच जसे की आपल्या उद्योगांच्या

**संपूर्ण आयुष्य लोकसेवेमध्ये राहून आता त्यांच्या विश्रांतीची वेळ आली तेव्हा माझ्यावर भार सोपवून निघून गेले. इतके गंभीर दायित्व मी कसे सांभाळू शकेल. कदाचित! त्यांच्या चरणात बसून अजून काही शिकू शकलो असतो.**

राष्ट्रीयकरणावेळी झाले होते. हा प्रवाह तुमची तार प्राप्त झाल्यानंतर 24 तास सुरूच राहिला आणि याच्याच मुळे चित्ताची तशीच स्थिती राहिली जसे की वर दिलेल्या दोन्ही वेळी झाली होती. याच कारणामुळे चित्त प्रकम्पित झाले नाही. ना मन उदास झाले, ना व्यथित झाले, ना तोंडातून उसासे टाकले आणि ना कुठल्याही प्रकारच्या भावावेशामध्ये डोळे ओले झाले. धर्माच्या अपूर्व विजयावर मन संतुष्ट, प्रसन्न आहे. पूज्य गुरुदेवांच्या निधनामुळे मी काय गमावले आहे हे तू चांगल्याप्रकारे अनुभव करू शकतोस. परंतु यावर सुद्धा चित्त संतुलित राहणे, त्यांच्याद्वारे दिल्या गेलेल्या या महान धर्म-चेतनेचेच तर परिणाम होते. 92 साधकांच्या या शिबिरात ह्या सूचनेमुळे जसे दुःखाची गडद सावली पडली. या निराश वातावरणात जर मी रडलो असतो तर सर्व शिबिर जोरजोरात रडले असते. कोणाचाही आक्रोश थांबवता आला नसता. सर्वच्या सर्व साधक-साधिका माझ्याबरोबर खूप संवेदनशील आहेत. परंतु मी समत्व धर्माचे पालन करून 'असोकं, विरजं, खेमं' राहून "चित्तं यस्स न कम्पति" चे उदाहरण ठेवून सर्व शिबिराला धर्माचे बळ दिले आणि अशाप्रकारे आपल्या परमपूज्य गुरुदेवांच्या पावन स्मृतीमध्ये धर्मानुकूल श्रद्धांजलीच अर्पित केली.

तुमची दुसरी तार संध्याकाळी 5.00 वाजता मिळाली. तार वाचताच पाहिले की सगळ्या गावाची वीज गेली, खरोखर प्रकाश लुप्त होऊन गेला. रात्री 1.30 वाजेपर्यंत चोहोबाजूंना काळोख पसरुन राहिला. संध्याकाळीच्या आधीच आकाशात काळोख पसरू लागला आणि तुमची तार आल्याबरोबर ऋतू नसून आकाश रडू लागले. पूर्ण रात्र आकाश रडत होते. दुसऱ्या दिवशी 3:00 वाजता अंत्यसंस्काराच्यावेळी तर पर्जन्य देवता इतके रडले की त्यांच्या आक्रोशाने काही क्षणांसाठी हृदय हेलावून गेले. वाटले सर्व निसर्ग रडत आहे. धरतीचा आक्रोश, हवेचा आक्रोश, सूर्याचा आक्रोश, ढगांचा आक्रोश, आकाशाचा आक्रोश, वृक्ष वेलींचा आक्रोश, सर्वांचा सम्मिलित आक्रोश सर्व वातावरणाला दुःखी करत होता. दीड दिवसाच्या या गहन आक्रोशानंतर निसर्ग प्रकृतिस्थ झाला. आकाश उघडले आहे, पर्जन्य देव रडून-ओरडून इकडे-तिकडे विखुरले गेले आहेत. खरोखर या पर्जन्य देवतांशी त्यांचा किती सखोल संबंध होता हे तर तेच जाणतात, जे त्यांच्याबरोबर राहिले आहेत. धरतीचे रडणे सुद्धा किती स्वाभाविक आहे. असा कोणी व्यक्ती धरतीवर हजारो वर्षात एकच वेळा उत्पन्न होतो. देव आणि मनुष्य यांचा महान शास्ता, भगवान गौतम बुद्धानंतर 25 शतके गेली, जेव्हा की या धरतीवर असा एक अनुशास्ता तयार झाला जो केवळ मनुष्यांचाच नाही तर देवांचा सुद्धा अनुशास्ता होता. धरती त्यांना गमावून दरिद्री झाली आहे. बर्मा देशाची भुमी आज या महापुरुषाशिवाय किती कंगाल झाली आहे– या गोष्टीला तोच समजू शकतो ज्याने ब्रह्मदेशाच्या त्या रत्नाला पारखले आणि ओळखले होते. दुसऱ्या कोणाला कसे समजेल बरे!

मां सयामांच्या आदेशानुसार आणि गुरुदेवांच्या अंतिम इच्छेनुसार शिबिराचा कार्यक्रम यथावत चालवला जात आहे. दीड-दोन दिवसांच्या पावसामुळे छतावरती लावलेल्या तंबूमध्ये साधक राहू शकले नाही, तरीही कसेतरी काम चालत राहिले आणि आता तर आकाश उघडले आहे. विश्वास आहे की 27 तारखेपर्यंत शिबिराचा कार्यक्रम निर्बाध, निर्विघ्नपणे पूर्ण होईल. पूज्य गुरुदेवांचे धर्म बळ माझ्याजवळ आहे आणि तेजीने प्रवाहमान पण होत आहे. त्याबरोबरच मां सयामांची मंगल मैत्रीही आहेच. मी अनाथ कसा होऊ शकतो. जोपर्यंत धर्म जिवंत आहे तोपर्यंत पूज्य गुरुदेव जिवंत आहेत. कारण ते तर मुर्तीमान धर्मच होते. आज मां सयामांची तार मिळाली की मी आपल्या धर्म-दुताच्या कार्यात दिरंगाई आणू देऊ नये. असा पूज्य गुरूदेवांचा आदेश होता. नाही, दिरंगाई येऊ देणार नाही. आता तर इतके मोठे दायित्व डोक्यावर येऊन पडले आहे.

14 डिसेंबर 1970 ला पूज्य गुरुदेवांनी आपल्या आचार्यत्वाची 25 वी वर्षगांठ मनविली. ठीक पंचवीस वर्षापूर्वी दादा गुरु सयातै जी महाराजांनी आपले शरीर त्यागतांना पूज्य गुरुदेवांच्या हातात धर्म ज्योती सोपविली होती, जिला या महापुरुषाने अजून अधिक प्रकाशमानच केले. भगवान बुद्धानंतर 2500 वर्षांपर्यंत आचार्यांच्या गुरू-शिष्य परंपरेला अक्षुण्ण बनवून ठेवण्यासोबत पूज्य गुरुदेवांनी ही मशाल सांभाळून ठेवली आणि 14 डिसेंबर 1970 ला ही मशाल माझ्या हातात देत तार आणि चिट्ठीद्वारे मला जणू हा धर्म दायाद सोपविला आणि याच्या एक महिन्यानंतर त्यांनी आपले काम पूर्ण करून या जीवनाकडे तोंड फिरवले. ज्यावेळी मला हे धर्म दायाद सोपविले गेले त्यावेळी मी याचे महत्त्व आणि या गुपिताला समजू शकलो नव्हतो. परंतु आता स्पष्ट अनुभवत होतो की त्यांनी याप्रकारे इतक्या शीघ्र निवृत्ती घेण्याचे का ठरविले. संपूर्ण जीवन लोक सेवेमध्ये लावल्यानंतर आता त्यांच्या विश्रांतीची वेळ आली तेव्हा हा भार माझ्यावर सोपवून निघून गेले. इतके गंभीर दायित्व मी कसे सांभाळू शकेन. कदाचित त्यांच्या चरणात बसून अजून काही शिकू शकलो असतो. परंतु नाही, काळ कोणासाठीही थांबत नाही. तो तर आपल्या गतीने पळतच आहे. मी माझ्या जीवनात तुमच्या छत्रछायेत राहून सर्व प्रकारची भौतिक सुख भोगली आहेत, मोठे ऐश्वर्य प्राप्त केले आहे. सगळ्या इच्छा पूर्ण केल्या आहेत. शेवटी अत्यंत सहज भावनेने आपले उर्वरित आयुष्य या धर्मसेवेमध्ये लावण्याचा संकल्प करताना मला कुठलीही अडचण झाली नाही. पूज्य गुरुदेवांनी ज्या विश्वासाबरोबर निर्वाण धातूची ही धर्म शिखा (मशाल) माझ्या हातात सोपविली आहे आणि निर्वाण धातू प्रजनन करू शकण्याचा मला जो अधिकार आणि बळ दिले आहे, मी त्याच्या योग्य बनो. यानिमित्ताने मां

**पूज्य गुरुदेवांचे खरे स्मारक तर तो प्रत्येक साधक आहे जो त्यांच्या या पावन साधना विधीमुळे लाभान्वित होऊन त्याला आपल्या जीवनाचे अंग बनवित आहे.**

सयामा, पूज्य पिताजी आणि माताजींबरोबर मोठा भाऊ आणि तुमचे आशीर्वाद तसेच देवी इलायचीचे धर्म बळ तसेच कुटुंबातील अन्य सगळ्या सदस्यांच्या मंगल कामना अपेक्षित आहेत. मला विश्वास आहे की या सगळ्या बळावर मी योग्य बुद्ध पुत्र सिद्ध होऊ शकेन.

### बोधगयामध्ये स्वयं शिबिर

हे शिबिर 27 ला पूर्ण होईल आणि त्यानंतर 28 च्या संध्याकाळी स्वतः 10 दिवसांच्या शिबिरात बसेन. मागच्या वेळी जेव्हा बोधगयात आलो तेव्हा इथे कोणी परिचित नव्हते त्यामुळे मला आपली साधना डाक बंगल्याच्या एका रूममध्ये करावी लागली. परंतु आता तर धर्माच्या बळाने सर्व परिस्थिती बदलली आहे. मंदिराचे पुजारी आणि व्यवस्था पहाणाऱ्यांनी स्वतः धर्म दीक्षा घेतली आहे. शेवटी माझ्यासाठी सर्व दार खुली उघडली आहेत. मंदिराच्या गर्भगृहात आणि बोधीवृक्षाखाली, म्हणजे सर्व बोधी मंडपाची धर्म तरंग इतकी तेज आहेत की तिथेच साधना करण्यासाठी बऱ्याच वेळा मोह होत राहतो आणि आता तर दोन्ही किल्ल्या माझ्या स्वाधीन केल्या गेल्या आहेत. अखेर आता मी रोज रात्री 10.00 वाजल्यापासून सकाळी 5.00 वाजेपर्यंत मंदिरात तसेच बोधी मंडपात साधना करून धर्म बळ संचय करीन. अशी संधी जीवनात पुन्हा-पुन्हा मिळत नाही. मंदिराच्या बरोबर समोर व्यवस्थापकाच्या कार्यालयाजवळ माझ्यासाठी एक छोटीशी एकांतशी झोपडी रिकामी केली गेली आहे. दिवसा मी तिथे राहून आणि रात्री जेव्हा मंदिराची कुलपं लावली जातात तेव्हा अधिक वेळ मंदिराच्या मुख्य गर्भगृहात आणि मध्ये-मध्ये बोधीवृक्षाखाली वज्रासनाजवळ साधना करेन. अशाप्रकारे रात्रीची वेळ त्या बोधी मंडपातच घालविन, जेथे नितांत, एकांत तसेच नीरव शांतता असते.

हो, 7 फेब्रुवारीला पूज्य गुरुदेवांच्या पावन स्मृतीमध्ये वृहद संघ दानाचे आयोजन करीत आहे. आपण त्यांचे वंशज आहोत, धर्मदायादचे उत्तराधिकारी आहोत, धर्म क्षेत्राचे औरस पुत्र आहोत, शेवटी त्यांचे निमित्त दानादिचा अधिकार आणि दायित्व आपलेच आहे. या प्रसन्नचित्ताने हे दायित्व निभावूया. भारतामध्ये राहणाऱ्या बर्मी भिक्षूंना तसेच भारतातल्या काही प्रसिद्ध भिक्षूंना आमंत्रण देत आहे. तुम्ही पूज्य गुरुदेवांच्या नावाने बर्मी भिक्षूंसाठी जे दानाचे सामान पाठविले, त्याचासुद्धा उपयोग करून तसेच त्यांच्या गौरवाला अनुसरून अजून काही दान पुण्य करीन. तसे तर भारतात आल्यानंतर जितके अनमोल धर्म दान केले आहे, ते सगळे त्यांचेच तर आहे, कारण त्यांच्या प्रतिनिधीच्या रूपात मी हे काम करीत आहे आणि भविष्यात सुद्धा जे काही करेन ते त्यांचेच असेल. त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी हा शिव-संकल्प घेत आहे.

आपला अनुज,

सत्य नारायण गोयंका



बोधगया मुख्य मंदिराच्या वरील ध्यान-कक्ष, जिथे पूज्य गुरुजींनी 1971 मध्ये रात्री स्वयं शिबिर करताना ध्यान केले होते.

### संघदानाचे आयोजन

ठिकाण : मुम्बई

12 फेब्रुवारी, 1971

बाबू भैया, सादर प्रणाम!

आत्ता-आत्ताच तुमचे 8 फेब्रुवारीचे पत्र मिळाले. यापूर्वी एक पत्र प्रिय श्रीप्रकाशच्या हातून तसेच दुसरे मोठे पत्र लाडसरियांच्या मुलांच्या हातून मिळाले होते. मी तुम्हाला आत्तापर्यंत काही उत्तर लिहू शकलो नाही. 28 जानेवारी ते 7 फेब्रुवारी पर्यंत माझी स्वत:ची साधना रात्री 10:00 ते सकाळी 5:00 पर्यंत एकांतात बुद्ध मंदिरात तसेच बोधि वृक्षाखाली होत राहिली, जेथे मध्य रात्रिपर्यंत प्रिय मुरारी आणि श्रीप्रकाश ही साधनेमध्ये सम्मिलित होत राहिले. शेवटचे दोन-तीन दिवस प्रिय गौरीशंकर आणि राधेश्यामही सम्मिलित झाले. याचे सुखद विवरण एखाद्या अन्य पत्रात लिहू शकेन.

7 फेब्रुवारीला 47 भिक्षू आमंत्रित केले होते परंतु 48 उपस्थित होते आणि संघ-दानाचे आयोजन पूज्य गुरुदेवांच्या गौरवा-अनुकूलच झाले. हो! ज्या वस्तु मुंबईहून खरेदी करून

मागवल्या होत्या. त्या काही कारणामुळे वेळेवर पोहोचू शकल्या नाहीत, परंतु दान-तर्पणा मध्ये त्यांचा संकल्प प्रकट केला गेला होता. आता त्या सर्व वस्तु भारताच्या भिन्न-भिन्न ठिकाणी राहणाऱ्या भिक्षूपर्यंत हळूहळू पोहोचविल्या जातील. तसा सर्व कार्यक्रम ज्या शांत धर्ममय वातावर्णांत संपन्न झाला, तो खूप प्रभावकारी राहिला. पूज्य गुरुदेवांच्या पावन स्मृति मध्ये साधना शिविर आणि आपल्या स्वयं साधने व्यतिरिक्त संघ-दानाचे वृहद आयोजन तर झालेच, त्याचबरोबरच या प्रसंगी '**सयाजी ऊ बा खिन स्मारक कोषा**' ची स्थापना झाली. ज्यामध्ये मोठ्या भावाने गोयन्का परिवारातर्फे एक मोठी रक्कम दान केली. त्या व्यतिरिक्त पूज्य पिताजी आणि माताजीं बरोबर परिवारातील अन्य सदस्यांनीही व्यक्तिगत रूपात आप-आपले दान दिले, तसेच तेथील काही अन्य साधकांनीही श्रद्धा स्वरूप आपली दान-पारमी पुष्ट केली. आणि आता विश्वास आहे की हा '**स्मारक निधि**' भविष्यात अन्य श्रद्धाळू साधकांद्वारे 'अक्षुण्ण' बनवून ठेवला जाईल. या निधिचा उपयोग कोणतेही स्मारक भवन निर्माण करण्यासाठी केला जाणार नाही, उलट पूज्य गुरुदेवांचे धर्म वैभव आणि धार्मिक भावनांना लक्षात घेऊन हेच उचित समजले की त्यांचे खरे स्मारक तो प्रत्येक साधक आहे जो त्यांच्या या पावन साधना विधिने लाभान्वित होउन त्याला आपल्या जीवनाचे अंग बनवतो. असे लोक अधिकाधिक संख्येमध्ये तयार होवोत आणि भविष्यात अनेक वर्षोंपर्यंत ही धर्म परंपरा कायम राहो! हीच पूज्य गुरुदेवांची खरी पावन स्मृति आणि श्रद्धांजलि होईल. तेव्हा या निधिचा उपयोग केवळ मात्र अर्थ विपन्न लोकांना विपश्यना साधना शिकवण्याच्या कामासाठीच केला जाईल.

बोधगया मध्ये पूज्य गुरुदेवांच्या निमित्त जे काही पुण्य कार्य केले गेले त्यामध्ये पूज्य पिताजी आणि माताजींसहित कुटुंबातील प्रत्येक सदस्य पुण्य-लाभी होवो, त्याचप्रकारे पूज्य गुरुदेवांचे सर्व साधक शिष्य ही पुण्य-लाभी होवोत, हीच मंगल कामना आहे.

तुमचा अनुज,
सत्य नारायण गोयन्का

## एका जुन्या साधकांवरअनुकम्पा

ठिकाण : मुम्बई
18 फेब्रुवारी, 1971

बाबू भैया, सादर प्रणाम!

जटनी (उड़ीसा)हून श्री लक्ष्मी नारायण पाटोदिया यांचे पत्र आहे. ते बोधगयामध्ये गुरुजींच्या निमित्ताने होणाऱ्या संघदानामध्ये सम्मिलित होण्याकरिता कलकत्त्याला पोहोचले होते परंतु रेल्वेच्या संपामुळे बोधगयेला येऊ शकले नाही. त्यांनी याप्रसंगी गुरुजींच्या स्मारक फंडामध्ये दान पाठविले आहे. जरी त्यांची आर्थिक स्थिति अत्यंत चिंताजनक आहे, तरीही त्यांचे हे उदारतापूर्ण दान त्यांच्या हृदयाच्या स्वच्छ श्रद्धेचेच प्रतीक आहे. ते आपल्या पत्रात लिहितात की त्यांची विपश्यना जागते, परंतु शारीरिक अस्वस्थता तसेच वर्तमान परिस्थितींमुळे अशांति आहे. मी त्यांना धीर देण्यासाठी एक पत्र तर लिहिले आहे. परंतु त्याच बरोबर मां सयामा यांना सूचित करणे की त्यांनी आपली मैत्री भावना पाठवावी जेणेकरून त्या जुन्या साधकाला शांतिलाभ होईल.

तुमचा अनुज,
सत्य नारायण गोयन्का



बोधगया मध्ये विपश्यनेच्या पुनरागमनाचे पहिले ऐतिहासिक शिबिर 9 ते 19 एप्रिल 1970 पर्यंत समन्वय आश्रमामध्ये लावले गेले. शिबिराच्या शेवटी लाभान्वित साधकांनी मिळून पूज्य गुरुजींचा सन्मान केला आणि फोटो काढले. खुर्चीवर बसलेल्या या लोकांमध्ये मधोमध गुरुजी आहेत, त्यांची पत्नी आणि श्रीलंकेचे विद्वान भिक्षू डॉ. धम्मरतनजी आहेत आणि त्यांच्या आधी समोरच्या बाजूला बसले आहेत अनागारिक श्री मुनिंद्रजी, जे महासी सयाडो विधीचे आचार्य होते आणि या शिबिरात बसून आयुष्यभरासाठी या विद्येचे प्रशंसक झाले.

## सयाजी ऊ बा खिन मेमोरियल ट्रस्ट ची स्थापना

ठिकाण : मुम्बई
13 फेब्रुवारी , 1971

बाबू भैया, सादर प्रणाम!

तुमच्या बऱ्याच पत्रांचे उत्तर लिहिणे बाकी आहे. एक-दोन दिवसात लिहू शकेन. आता तर केवळ एक-दोन गोष्टी शीघ्रतेने लिहू इच्छितो.

1. माता सयामा तसेच, ऊ टिं यी, ऊ बा फो, ऊ छिट टिन (U Tin Yee, U Ba Pho, U Chit Tin) यांना सांगणे की मी इथे "सयाजी ऊ बा खिन मेमोरियल फाउंडेशन" या नावाने एक संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात माझ्या द्वारे विश्वभरात जे काही धर्म कार्य होइल, ते पूज्य गुरुदेवांच्या स्मारक-स्वरूपात याच्याच अंतर्गत होईल. सर्व विपश्यना ध्यान

केंद्रे "सयाजी ऊ बा खिन मेमोरियल विपश्यना केंद्र" म्हणून ओळखली जातील..

2. बोधगया मंदिराची प्रबंध समिति साधारणपणे या मंदिराला एक ऐतिहासिक पुरातत्वाचेच महत्त्व प्रदान करत आली आहे आणि याला एक पर्यटक केंद्राच्या रुपामध्ये पहात आहे. परंतु मागील 2 महिन्याचा माझा बोधगया-प्रवास आणि इथे झालेल्या धर्म शिबिरांमुळे लोकांमध्ये सद्धर्माच्या प्रति खूप धर्मचेतना जागली आणि मला सर्व लोकांची खोलवर सहानुभूति तसेच खोलवर आत्मियता प्राप्त झाली. म्हणून मी हा निर्णय घेतला की प्रबंध समितिकडून या गोष्टीची सूट मागितली जावी की मंदिराच्या शिखराला आपण "स्वर्ण मंडित" करु शकू आणि त्यावर एक प्रकाश-दीप लावू, जसे की बर्मामध्ये आपल्या धर्म स्तुपावर तसेच अन्य सर्व स्तुपांवर अधिकांशत: असतो. प्रबंध समितिने याआधी सीलोन आदिच्या अनेक भक्तांच्या अशा मागण्या यासाठी नाकारल्या होत्या की यामुळे या मंदिराची पुरातात्विक विशेषता अक्षुण्ण राहणार नाही. परंतु आता जे सहानुभूतीचे वातावरण तयार झाले आहे, त्यामुळे मला यामध्ये सफलता प्राप्त होण्याची शक्यता आहे. मला विश्वास वाटतो की हे काम पूज्य गुरुदेवांच्या मनोभावनेच्या अनुकूलच होईल. मला असे वाटते की यासाठी सारे धन जे काही खर्च होइल ते सर्व बर्माहूनच यावे. तिथलेच स्वर्ण पत्र आणि तिथल्याच कारागिरांनी या कार्याला संपन्न करावे. या निमित्ताने मला बर्मी दूतावासामार्फत आपल्या देशाच्या "बो जो जी" चा सहयोग प्राप्त होण्याची पूर्ण शक्यता आहे. यासाठी दानाचा प्रबंध तेथील साधकांना करावा लागेल जे मला कठीण वाटत नाही.

3. महाबोधी सोसायटी ऑफ इंडिया द्वारा प्रकाशित इंग्रजीचे त्रैमासिक पत्र "द महा बोधि जर्नल" चे संपादक डॉ. भिक्षु धर्मरत्नजी, गुरुजींच्या निमित्ताने होणाऱ्या संघदानासाठी बोधगयेला आले होते. त्यांनी या गोष्टीसाठी सहमती प्रकट केली आहे की 1-2 महीन्यानंतर 'महाबोधि' चा एक विशेषांक "सयाजी ऊ बा खिन स्मारक" च्या रुपात प्रकाशित केला जाईल, ज्यामध्ये सर्व सामग्री त्यांच्याच संबंधातील असेल. याच प्रकारचा एक स्मारक अंक हिंदीच्या "धर्म-दूत" द्वारेही काढला जाईल. आम्ही आपल्यातर्फे एक स्मारक पुस्तिका काढू इच्छित होतो परंतु जर यांनी त्यांच्याच त्रैमासिक पत्रात असे केले तर अजूनच उत्तम होईल. आता हे आवश्यक आहे की यासाठी बर्मा तसेच विदेशामध्ये जिथे-जिथे गुरुजींचे शिष्य साधक आहेत त्या सर्वांना "ऊ बा फो" यांच्याकडून एक पत्र पाठवण्यात यावे आणि त्या सर्वांनी गुरुजींच्या संबंधातील आपले संस्मरण आणि आपली श्रद्धांजलि प्रकट करून काही लिहून पाठवावे म्हणजे हे दोन्ही अंक आपल्या गौरवा-अनुकूलच प्रकाशित होतील. तेव्हा हे काम लवकरच व्हावे. मी देखील वेळ काढून याच आशयाचे एक पत्र इंग्रजी मध्ये लिहीन.

तुमचा अनुज

सत्य नारायण गोयन्का

("द महा बोधी जर्नल", ऊ बा खिन मेमोरियल अंक, एप्रिल -1972. पत्रिकेच्या मुखपृष्ठावर सयाजी ऊ बा खिन यांच्या रेखाचित्राबरोबर हा विशेषांक प्रकाशित झाला होता. सं.)

### अतिरिक्त उत्तरदायित्व

1. श्री रामकृष्ण बांते (व.स.आ.) धम्मवसुधा केंद्राचे केंद्र-आचार्यांच्या रुपात सेवा

### नवीन उत्तरदायित्व आचार्य

1. श्री सुनील व श्रीमती विद्या बागडे (केंद्र-आचार्य, धम्म भण्डार)
2. श्री जयपार सिंह तोमर, (केंद्र-आचार्य, धम्म अनाकुल)
3. श्री विनय दहाट, (विदर्भ क्षेत्राच्या समन्वयक क्षे.आचार्यांची सहायता.)

### वरिष्ठ सहायक आचार्य

1. श्रीमती तारा पोखरेल, नेपाळ
2. Mr. Jian Zhong Cai (JC2), China
3. Mr. Shiran Fan (SF1), China
4. Mr. Jie Liu (JL3), China
5. Mr. Meng Sun(MS19), China
6. Mrs. Lina Guo (LG), China
7. Mrs. Jia Rui (Julia) Qian (JQ), China
8. Mrs. Jin Hua Yang (JY), China
9. Ms Chen Liu (CL1), Taiwan
10. Ms Ruo-yu Tan (RYT), Taiwan

### नव नियुक्त सहायक आचार्य

1. श्री जयेश भाई मेहता, मदुराई
2. श्रीमती शिल्पा मेहता, पुणे
3. श्री नरेंद्र हेंगाडे, पुणे
4. श्री योगेश गांधी, पुणे
5. श्रीमती मंजुलाबेन साकरिया, जेतपुर (गुज.)
6. श्री ओम दत्त रगमी, नेपाळ
7. श्री जीवन कुमार शाक्य, नेपाळ
8. Mr. Ji Ming LI, China

### बालशिबिर शिक्षक

1. श्री आलोक खांडेकर, बालाघाट
2. कु. सोनाली बरमाटे, बालाघाट
3. श्री. राजकुमार वाघमारे, बालाघाट
4. श्रीमती शीतल मेश्राम, नागपुर
5. श्री अविनाश मेश्राम, नागपुर
6. प्रो. ममता साहू, नागपुर
7. कु. रीनल पटेल, यू.के. (UK)

## मंगल मृत्यू

वाराणसीच्या डॉ. प्रेमनारायण सोमानी यांनी 93 वर्षाच्या वृध्दापकाळात 1 सप्टेंबर 2021 ला खूप शांतीपूर्वक शरीराचा त्याग केला. त्यांनी विपश्यनेचे पहिले शिबीर केल्यानंतरच सर्व आयुष्य विपश्यनेला समर्पित केले होते. 1996 मध्ये सहाय्यक आचार्यपदी नियुक्ती झाले आणि 2009 मध्ये वरिष्ठ सहाय्यक आचार्य झाल्यावर साधकांची खूप सेवा केली. अनेक वर्ष धम्मचक्क विपश्यना केंद्राच्या केंद्र आचार्यांचे सहाय्यक राहिले. केंद्राला पुढे वाढवण्यासाठी प्रत्येक संभव सहयोग दिला आणि अंतिम क्षणापर्यंत सेवाकार्य करत राहिले. मृत्यूपूर्वी त्यांनी स्वतः अंघोळ करून आणि कपडे घालून, आडवे पडून अंतिम श्वास घेतला. ते धर्मपथावर सतत पुढे वाटचाल करीत निर्वाणलाभी होवोत, धम्म परिवाराकडून हीच मंगल कामना आहे.

## अति महत्वपूर्ण सूचना

1. सेंट्रल आईवीआर (इंटरैक्टिव्ह वॉयस रिस्पॉन्स) संभाषण नंबर - ०२२-५०५०५०५१

अर्जदार या नंबरवर आपल्या नोंदवलेल्या मोबाईल नंबर (फॉर्म मधील उल्लेखित नंबर) ने आपली शिबिर नोंदणीची स्थिति तपासण्यासाठी, रद्द करण्यासाठी, स्थानांतरीत करण्यासाठी अथवा कुठल्याही सेंटरवर नोंदणी केलेल्या आपल्या अर्जाची पुष्टी करण्यासाठी कॉल करू शकतात. ते या सिस्टीमद्वारे केंद्राशी सुद्धा संपर्क करू शकतात. हा भारताच्या सगळ्या विपश्यना केंद्रांसाठी एक केंद्रीय संपर्क नंबरआहे.

2. जर अकेंद्रीय (नॉन-सेंटर) भावी शिबिरांचे कार्यक्रम पत्रिकेत प्रकाशन करण्यासाठी पाठवू इच्छिता, तर कृपया त्यांनी आपल्या समन्वयक क्षेत्रिय आचार्य (सीएटी) यांच्या सहमती पत्राबरोबर पाठवावे, जेव्हा की स्थापित केंद्राचे कार्यक्रम केंद्रीय आचार्य (सीटी) यांच्या सहमती पत्राबरोबर आले पाहिजेत. याशिवाय आम्ही कोणतेही कार्यक्रम पत्रिकेत प्रकाशित करू शकत नाही.

3. जर एखाद्या नव्या व्यक्तीला केंद्र आचार्य (CT) बनविले गेले तर त्याबरोबर त्यांच्या हस्ताक्षरातील स्वीकृती पत्र (CTAL) जरूर पाठवावे, जसे ए टी किट 2012 (सहाय्यक आचार्यांची अनुशासन सहिता) च्या शेवटी छापले आहे. त्यानंतरच त्यांचे नाव पत्रिकेत व आचार्यांच्या विवरण पुस्तिकेत छापले जाईल.

## आता साधक शिबिराचे आवेदन करण्यासाठी खालील नवीन वेबसाइट चा उपयोग करू शकतात:-

https://schedule.vridhamma.org/

## ऑनलाइन भावी शिविर कार्यक्रम व आवेदन

सर्व भावी शिबिरांची माहिती नेटवर उपलब्ध आहे. कोविड- १९ च्या नव्या नियमानुसार सर्व प्रकारचे बुकिंग केवळ ऑनलाईन होत आहे. फॉर्म किंवा एप्लीकेशन आता स्वीकारले जात नाही. म्हणून आपल्याला निवेदन आहे की खालील लिंक वर चेक करा आणि आपल्याला उपयुक्त शिबिरासाठी अथवा सेवेसाठी सरळ ऑनलाईनच आवेदन करा.

https://www.dhamma.org/en/schedules/schgiri

**कृपया अन्य केंद्रांच्या कार्यक्रमानुसार सुद्धा याच प्रकारे आवेदन करा. अन्य केंद्रांच्या कार्यक्रमांचे विवरण कृपया खालील लिंक वर पहा-**

https://www.dhamma.org/en-US/locations/directory#IN

## भावी शिबिर कार्यक्रम

**केंद्रांचे 2021 च्या शिबिराचे कार्यक्रम आले आहेत. त्यांनाच या महिन्यात प्रकाशित करीत आहोत. कोविड- 19 च्या सर्व नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे. सर्व नियम आवेदन पत्रासोबत इंटरनेटवर दिले गेले आहेत. जर कोणी ते पाहू शकला नाही तर संबंधित केंद्राला थेट संपर्क करावा.**

**आवश्यक सुचना —**

१- कृपया नियमावली मागवून वाचावी आणि संबंधित व्यवस्थापकाकडे आवेदन पत्र पाठवून तेथून **स्वीकृति-पत्र** मागवावे.

2- **एक दिवसीय, लघु / स्वयं शिबिर:** केवळ जुन्या साधकांसाठी, ज्यांनी दहा दिवसांचे विपश्यना शिबिर पूर्ण केले असेल.

3- **सतिपट्ठान शिबिर:** कमीत कमी तीन शिबिर पूर्ण केलेल्या साधकांसाठी, जे मागील एका वर्षापासून नियमित आणि गंभीरतापूर्वक रोज साधना करीत असतील. (लघु व सति. शिबिराचा समारोप शेवटच्या दिवशी संध्याकाळी होतो.)

4- **किशोरांचे शिबिर:** (15 वर्ष पूर्ण ते 19 वर्ष पूर्ण) (**कृपया किशोरांच्या शिबिरांसाठी बनविलेल्या नव्या आवेदन पत्राचा वापर करावा.**)

5- **दीर्घ शिबिर - ∞ 20 दिवसीय शिबिर:** पाच दहा दिवसीय शिबिर, एक सतिपट्ठान शिबिर केलेल्या आणि एक दहा-दिवसीय शिबिरात सेवा दिलेल्या साधकांसाठी, जे मागील दोन वर्षांपासून रोज साधना करतात व विधिप्रती एकनिष्ठ व पूर्णसमर्पित आहेत.

6- **30 दिवसीय शिबिर:** ज्यांनी 20 दिवसीय शिबिर केले असेल व एका शिबिरात धर्मसेवा दिली असेल. (दीर्घ शिबिरांमध्ये 6 महिन्यांचे अंतर आवश्यक आहे.) (जेथे 30 व 45 दिवसांचे सोबत होतील, तेथे आनापान 10 दिवसांचे आणि जेथे केवळ 45 दिवसाचे तेथे 15 दिवसांचे होतील)

7- **45 दिवसीय शिबिर:** ज्यांनी दोन 30 दिवसीय शिबिर पूर्ण केले असतील व धम्मसेवा देत असतील. 60 दिवसीय शिबिर: केवळ सहायक आचार्यांसाठी ज्यांनी दोन 45 दिवसीय शिबिर पूर्ण केले असतील.

8- **विशेष 10-दिवसीय शिबिर:** पाच दहा सामान्य शिबिर, एक सतिपट्ठान शिबिर आणि एक दहा-दिवसीय शिबिरात सेवा दिलेल्या साधकांसाठी, जे मागील दोन वर्षांपासून नियमित रोज साधना करत असतील व विधिप्रती एकनिष्ठ व पूर्णपणे समर्पित असतील.

### 14 दिवसीय कृतज्ञता-शिविर / स्वयं शिबिर

हे कृतज्ञता-शिबिर "आचार्य स्वयं शिविर" चेच स्वरूप आहे. शिबिर प्रारूप बिल्कुल तसेच राहील. पूज्य गुरुजी व माताजी आता राहिले नाहीत, त्यामुळे त्यांच्याप्रति व संपूर्ण परंपरेप्रति कृतज्ञता व्यक्त करून आम्ही त्या सर्वांच्या धर्मतरंगांचा लाभ घेऊ. या दीर्घ शिबिरात अधिकाधिक लोक भगवान बुद्धांच्या याविरुद्ध– **समग्गानं तपो सुखो।** म्हणजे, एकत्र तप करण्याच्या परम सुखाचा लाभ घेऊ शकतील, प्रसन्नतेची बाब ही आहे की फेब्रुवारीच्या या तिथीदरम्यान हिंदी तिथीनुसार पूज्य गुरुजी व माताजींच्या जन्म व जयंत्याही येतात. **शिविर की योग्यता–** या **दीर्घ शिबिरामध्ये** सम्मिलित होण्यासाठी केवळ एक सतिपट्ठान शिबिर, धर्माच्या प्रचार व प्रसारात योगदान व स्थानिक आचार्यांची परवानगी आवश्यक आहे.

**सुनिश्चित दिनांक:** प्रत्येक वर्षी 2 ते 17 फेब्रुवारी.

स्थानिक मागणी लक्षात ठेऊन ज्या केंद्रात एकट्या निवासाची सोय असेल, ते केंद्र या गंभीर शिबिराला आपल्या कार्यक्रम पत्रिकेत स्थान देऊ शकतात.

**∞ दीर्घ शिबिरांसाठी नवीन संशोधित आवेदन पत्राचाच वापर करावा. ह्याला धम्मगिरी अथवा अन्य दीर्घ शिबिरांच्या केंद्रातून प्राप्त करता येईल. (वरील सर्व शिबिरांचे आवेदन पत्र एकसारखे आहे.) हिंदी वेबसाट हेतु लिंक–** www.hindi.dhamma.org

### इगतपुरी एवं महाराष्ट्र

### धम्मगिरि : इगतपुरी (महाराष्ट्र)

**विपश्यना विश्व विद्यापीठ,** इगतपुरी-422403, नाशिक, फोन: (02553) 244076, 244086, 244144, 244440 (केवळ कार्यालयीन वेळेत सकाळी: 10 ते सायं 5 वाजेपर्यंत). फॅक्स: 244176. Email: info@giri.dhamma.org (**नोंदणीविना प्रवेश बिल्कुल नाही) दहा-दिवसीय:** 30-10 ते 10-11, 13 ते 24-11, 27-11 ते 8-12, 25-12-21 ते 5-1-2022, 2022» 8 ते 19-1, 23-2 ते 6-3, 9 ते 20-3, 23-3 ते 3-4, 19 ते 30-4, 4 ते 15-5, 18 ते 29-5, 1 ते 12-6, 15 ते 26-6, 29-6 ते 10-7, 27-7 ते 7-8, 10 ते 21-8, 24-8 ते 4-9, 7 ते 18-9, 21-9 ते 2-10, 19 ते 30-10, 16 ते 27-11, 30-11 ते 11-12, 25-12-22 ते 5-1-2023, **सतिपट्ठान:** 2021» 7 ते 15-10, 2022» 21 ते 29-1, 6 ते 14-10, **समन्वयक क्षेत्रीय आचार्य व आचार्य सम्मेलन:** 13-12-2021, 2022» 13-12-2022, **सहायक आचार्य सम्मेलन:** 14 ते 16-12-2021, 2022» 14 ते 16-12-2022, **सहायक आचार्य कार्यशाळा:** 17 ते 20-12-2021, 2022» 17 ते 20-12-2022, **प्रशिक्षक कार्यशाळा:** 21-12-2021, 2022» 21-12-2022, **ट्रस्टी व धम्मसेवक कार्यशाळा:** 16 ते 17-10-201, 2022» 15 ते 16-10, **कृतज्ञता-शिविर:** 2022» 2 ते 17-2,

**∞ दीर्घ-शिविर: विशेष दस-दिवसीय:** 2022» 13 ते 24-7, (गंभीर सुचना- ० कृपया लक्ष द्यावे की धम्मगिरीत बुकिंग केल्याशिवाय येऊ नये, परत पाठवतांना शिबिरार्थीलाही त्रास होतो व आम्हालाही. ० ज्या क्षेत्रात केंद्र आहे, त्या क्षेत्राच्या लोकांनी तेथेच आवेदन करावे. विशेष कारणविना धम्मगिरीत त्यांचे आवेदन स्वीकारले जाणार नाहीत. ० कृपया स्वीकृति-पत्र आपल्या सोबत अवश्य आणावे. ० येणे शक्य नसल्यास तशी सुचना वेळेअगोदर अवश्य कळवावी.)

### धम्मतपोवन-1 : इगतपुरी (महाराष्ट्र)

∞ **दीर्घ-शिविर: 45-दिवसीय:** 19-12 ते 3-2-2022, **60-दिवसीय:** 12-10 ते 12-12.

### धम्मतपोवन-2 : इगतपुरी (महाराष्ट्र)

**दहा-दिवसीय एक्जीक्यूटिव शिबिर:** 30-11 ते 11-12, ◊ **सतिपट्ठान:** 18 ते 26-11,

∞ **दीर्घ-शिविर: 30-दिवसीय:** 25-9 ते 26-10, **45-दिवसीय:** 25-9 ते 10-11, **60-दिवसीय:** 23-7 ते 22-9, 17-12 ते 16-2-2022.

### धम्मपत्तन : गोराई, बोरीवली, मुंबई

**धम्मपत्तन, विपश्यना केन्द्र,** एस्सेल वर्ल्ड के पास, गोराई खाड़ी, बोरीवली (पश्चिम) मुंबई-- 400 091, फोन: +91 8291894650, टेली. (+09122) 50427518, Ext. No. (पुरुष कार्यालय)» 519 (50427519), (महिला कार्यालय)» 546 (50427546), (सुबह 11 ते सायं 5 बजे तक); Website: www.pattana.dhamma.org, **दहा-दिवसीय एक्जीक्यूटिव शिबिर:** 29-9 ते 10-10, 13 ते 24-10, 27-10 ते 7-11, 10 ते 21-11, 24-11 ते 5-12, 8 ते 19-12, 22-12 ते 2-1-2022, **1-दिवसीय मेगा:** 26-9-21, 9-1-22.
Email: registration_pattana@dhamma.net.in; ऑनलाइन बुकिंग: www.dhamma.org/en/schedules/schpattana.shtml "धम्मपत्तन" विपश्यना केंद्रात केवळ 90 साधकांसाठी स्थान आहे. त्यामुळे सर्व साधकांना विनंती आहे की ज्यांना शिबिरासाठी स्वीकृति मिळाली, त्यांनीच यावे आणि ज्यांना स्वीकृति मिळाली नाही, त्यांनी कृपया कोणत्याही प्रकारचा आग्रह करु नये. ० कृपया आपला आपात्कालीन फोन-संपर्क (शेजारचा असला तरी) अवश्य लिहावा.)

**एक दिवसीय शिबिर :** ग्लोबल विपश्यना पॅगोडा, गोराईगांव, मुंबई प्रत्येक रविवारी- सकाळी 11 ते सायं 4 वाजेपर्यंत (पॅगोड्याच्या घुमटात होते, त्यामुळे साधकांना भगवान बुद्धांच्या पावन धातूंच्या सान्निध्यात ध्यान करण्याची संधी प्राप्त होते.) **संपर्क:** फोन: 022-28452235. Email: info@globalpagoda.org;
कृपया आपल्यासोबत पिण्याच्या पाण्याची बाटली अवश्य आणावी. पिण्याचे पाणी मोठ्या बाटलीत (20 लीटर) उपलब्ध राहील. त्यातून आपली बाटली भरुन आपल्याजवळ ठेवता येईल.

**येणाऱ्या दर्शकांसाठी लघू आनापान शिबिर**

ग्लोबल पॅगोड्यात रोज सकाळी 11 ते दुपारी 4 वाजेपर्यंत पंधरा-वीस मिनिटांचे इंग्रजी हिंदी लघू आनापान प्रशिक्षण सत्र सुरु असते. सकाळी 11 वाजता प्रथम सत्र व दुपारी 4 वाजता अंतिम सत्र. यात भाग घेणाऱ्याला पूर्ण प्रशिक्षण सत्रात बसणे अनिवार्य आहे

### धम्मविपुल : बेलापुर (नवी मुंबई)

प्लॉट नं. 91 ए; सेक्टर 26, पारसीक हिल, सीबीडी बेलापुर, (पारसीक हिल, सीवुड दारावे रेल्वे स्टेशन जवळ हर्बर लाईन) नवी मुंबई 400 614. **संपर्क:** फोन: 022-27522277, 27522404/03 (सकाळी 11 ते सायं 5 वाजेपर्यंत). Email: dhammavipula@gmail.com, बुकिंग केवळ ऑनलाइन: http://www.vipula.dhamma.org/ **दहा-दिवसीय:** 29-9 ते 10-10, 13 ते 24-10, 27-10 ते 7-11, 10 ते 21-11, 24-11 ते 5-12, 21-12 ते 1-1-22, **2022»** 3 ते 14-1, 9 ते 20-2, 23-2 ते 6-3, 9 ते 20-3, 23-3 ते 3-4, 6 ते 17-4, 20-4 ते 1-5, 4 ते 15-5, 18 ते 29-5, 1 ते 12-6, 15 ते 26-6, 29-6 ते 10-7, 13 ते 24-7, 27-7 ते 7-8, 10 ते 21-8, 24-8 ते 4-9, 7 ते 18-9, 21-9 ते 2-10, 5 ते 16-10, 19 ते 30-10, 2 ते 13-11, 16 ते 27-11, 30-11 ते 11-12, 21-12 ते 1-1-23, **3-दिवसीय: 9 ते 12-12-21, 1-दिवसीय:** प्रत्येक रविवारी. सामू. साधना: दररोज सकाळी: 9 ते रात्री 9 पर्यंत, साधक आपल्या वेळेनुसार येऊन ध्यान करु शकतात,
∞ **कृतज्ञता-शिविर 2022» 16-1 ते 6-2,**

### धम्मवाहिनी : टिटवाळा

**मुंबई परिसर विपश्यना केंद्र,** गांव रूंदे, टिटवाळा (पूर्व) कल्याण, जि. ठाणे. Website www.vahini.dhamma.org, नोंदणी केवळ ऑनलाईन; Email: vahini.dhamma@gmail.com **संपर्क:** मोबाईल: 97730-69978, 9004620434, केवळ कार्यालयाच्या दिवशी– 12 ते सायं 6 वाजेपर्यंत. **दहा-दिवसीय:** 25-9 ते 6-10, 9 ते 20-10, 2022» 8 ते 19-1, 22-1 ते 2-2, 5 ते 16-2, 19-2 ते 2-3, 5 ते 16-3, 19 ते 30-3, 2 ते 13-4, 16 ते 27-4, 30-4 ते 11-5, 14 ते 25-5, 28-5 ते 8-6, 11 ते 22-6, 25-6 ते 6-7, 9 ते 20-7, 23-7 ते 3-8, 6 ते 17-8, 3 ते 14-9, 17 ते 28-9, 1 ते 12-1 0,
**∞ दीर्घ-शिबिर: विशेष दस-दिवसीय:** 2022» 20 ते 31-8, **20-दिवसीय:** 2021» 27-10 ते 17-11, **30-दिवसीय:** 2021» 20-11 ते 21-12, **45-दिवसीय:** 2021» 20-11 ते 5-1-2022

### धम्म वाटिका : पालघर

**पालघर विपश्यना केंद्र,** गट नं. 198-2/ए, अल्याली क्रिकेट ग्राउंडच्या मागे, अल्याली, पालघर-401404, **संपर्क केंद्र** 91 9637101154, Email: info@vatika.dhamma.org, **संपर्क:** 1) श्री इराणी, मो. 9270888840, 2) श्री अनिल जाधव, मो. 91 9049151464, **दहा-दिवसीय:** (केवळ पुरुष) 8 ते 19-10, 21-10 ते 1-11, 21-11 ते 2-12, 25-12-21 ते 5-1-22, (केवळ स्त्रियां) 24-9 ते 5-10, 7 ते 18-11, ◆ **सतिपट्ठान:** (केवळ स्त्रियां) 5 ते 13-12,

### धम्मानन्द : पुणे (महाराष्ट्र)

**पुणे विपश्यना केंद्र,** (नोंदणीविना प्रवेश नाही) मरकळ गावाजवळ, आळंदी पासून 8 कि.मी. **दहा-दिवसीय:** (केवळ हिंदी व मराठी भाषी)» **2021»** 9 ते 20-10, 13 ते 24-11, 11 ते 22-12, **2022»** 8 ते 19-1, 12 ते 23-2, 12 ते 23-3, 9 ते 20-4, 9 ते 20-4, 14 ते 25-5, 11 ते 22-6, 9 ते 20-7,13 ते 24-8, 10 ते 21-9, 8 ते 19-10, 12 ते 23-11, 10 ते 21-12, (**केवळ हिंदी व इंग्रजी भाषी)» 2021»** 25-9 ते 6-10, 27-11 ते 8-12, 25-12 ते 5-1, **2022»** 22-1 ते 2-2, 26-3 ते 6-4, 23-4 ते 4-5, 28-5 ते 8-6, 25-6 ते 6-7, 23-7 ते 3-8, 27-8 ते 7-9, 24-9 ते 5-10, 26-11 ते 7-12, 24-12 ते 4-1, ◊ **सतिपट्ठान:** (केवळ हिंदी व इंग्रजी भाषी)» **2021»** 23 ते 31-10, **2022»** 29-10 ते 6-11, (केवळ हिंदी व मराठी भाषी)» **2022»** 26-2 ते 6-3, **3-दिवसीय: 2022»** 3 ते 6-2, 5 ते 8-5, 4 ते 7-8, 20 ते 23-10, **संपर्क:** पुणे विपश्यना समिति, फोन: (020) 24468903, 24436250. Email: info@ananda.dhamma.org; टे.फैक्स: 24464243.

### दीर्घ शिबिर कार्यक्रम (भारत)

### विशेष 10-दिवसीय

| | |
|---|---|
| 6 ते 17-10-2021 | धम्मनाग - नागपुर (महाराष्ट्र) |
| 6 ते 17-10-2021 | धम्मबोधि -बोधगया (बिहार) |
| 15 ते 26-10-2021 | धम्मपट्ठान - सोनीपत (हरियाणा) |
| 17 ते 28-10-2021 | धम्मसरोवर - धुळे (महाराष्ट्र) |
| 20-11 ते 1-12-2021 | धम्मकल्याण - कानपुर (उ. प्र.) |
| **14 ते 25-12-2021** | धम्मखेत्त - हैदराबाद (तेलंगाना) |
| 6 ते 17-4-2022 | धम्मनाग - नागपुर (महाराष्ट्र) |
| 10 ते 21-4-2022 | धम्मथली - जयपुर (राजस्थान) |
| 19 ते 30-6-2022 | धम्मथली - जयपुर (राजस्थान) |
| **13 ते 24-7-2022** | धम्मगिरि - इगतपुरी (महाराष्ट्र) |
| 20 ते 31-7-2022 | धम्मपुब्बज - चूरू (राजस्थान) |
| 9 ते 20-8-2022 | धम्मभण्डार - भंडारा (महाराष्ट्र) |
| 20 ते 31-8-2022 | धम्मवाहिनी - टिटवाला |
| **20 ते 31-8-2022** | धम्म पुष्कर - पुष्कर (अजमेर, राजस्थान) |
| 9 ते 20-10-2022 | धम्मथली - जयपुर (राजस्थान) |

| | |
|---|---|
| 12 ते 23-10-2022 | धम्मसेतु - चेन्नई (तमिलनाडु) |
| 20 ते 31-12-2022 | धम्मपुब्बज - चूरू (राजस्थान) |

### कृतज्ञता शिबिर

| | |
|---|---|
| 16-1 ते 6-2-2022 | धम्मविपुल - बेलापुर (नवी मुंबई) |
| 26-1 ते 10-2-2022 | धम्मपीठ - अहमदाबाद (गुजरात) |
| 2 ते 17-2-2022 | धम्मगिरि - इगतपुरी (महाराष्ट्र) |
| 2 ते 17-2-2022 | धम्मसरोवर - धुळे (महाराष्ट्र) |
| 2 ते 17-02-2021 | धम्मनाग - नागपुर (महाराष्ट्र) |
| 2 ते 17-2-2022 | धम्मपुब्बज - चूरू (राजस्थान) |
| 2 ते 17-2-2022 | धम्मसेतु - चेन्नई (तमिलनाडु) |
| 2 ते 17-2-2022 | धम्म मधुरा - मदुराई (तमिलनाडु) |
| 2 ते 17-2-2022 | धम्म नागाज्जुन -2 नागार्जनसागर (तेलंगाना) |
| 2 ते 17-2-2023 | धम्म नागाज्जुन -2 नागार्जनसागर (तेलंगाना) |

### 20-दिवसीय

| | |
|---|---|
| 28-9 ते 19-10-2021 | धम्मथली - जयपुर (राजस्थान) |
| 6 ते 27-10-2021 | धम्मबोधि - बोधगया (बिहार) |
| 7 ते 28-11-2021 | धम्म पुष्कर - पुष्कर (अजमेर, राजस्थान) |
| 27-10 ते 17-11-2021 | धम्मवाहिनी - टिटवाला |
| 4 ते 25-12-2021 | धम्मलक्खण - लखनऊ (उ. प्र.) |
| 14-12-21 ते 4-1-22 | धम्मखेत्त - हैदराबाद (तेलंगाना) |
| 6 ते 27-2-2022 | धम्मथली - जयपुर (राजस्थान) |
| 2 ते 23-2-2022 | धम्मसेतु - चेन्नई (तमिलनाडु) |
| 4 ते 25-5-2022 | धम्म नागाज्जुन -2 - नागार्जनसागर (तेलंगाना) |
| 10 ते 31-7-2022 | धम्म पुष्कर - पुष्कर (अजमेर, राजस्थान) |
| 28-10 ते 17-11-2022 | धम्मसरोवर - धुळे (महाराष्ट्र) |
| 28-10 ते 18-11-2022 | धम्मथली - जयपुर (राजस्थान) |
| 11-11 ते 2-12-2022 | धम्म पुष्कर - पुष्कर (अजमेर, राजस्थान) |

### 30-दिवसीय

| | |
|---|---|
| 25-9 ते 26-10-2021 | धम्मतपोवन-2 - इगतपुरी (महाराष्ट्र) |
| 1-10 to 1-11-2021 | धम्मउत्कल - खरियार रोड (उडीसा) |
| 22-10 ते 22-11-2021 | धम्म नागाज्जुन -2 - नागार्जनसागर (तेलंगाना) |
| 6-11 ते 7-12-2021 | धम्मचक्क - सारनाथ (उ. प्र.) |
| 7-11 ते 8-12-2021 | धम्म पुष्कर - पुष्कर (अजमेर, राजस्थान) |
| 20-11 ते 21-12-2021 | धम्मवाहिनी - टिटवाला |
| 21-12-2021 ते 21-1-2022 | धम्म अम्बिका - दक्षिण गुजरात, गुजरात |
| 14-12-21 ते 14-1-22 | धम्मखेत्त - हैदराबाद (तेलंगाना) |
| 30-1 ते 2-3-2022 | धम्मकेतु - दुर्ग (छत्तीसगढ़) |
| 2-2 ते 5-3-2022 | धम्मसेतु - चेन्नई (तमिलनाडु) |
| 6-2 ते 9-3-2022 | धम्मथली - जयपुर (राजस्थान) |
| 4-5 ते 4-6-2022 | धम्म नागाज्जुन -2 - नागार्जनसागर (तेलंगाना) |
| 10-7 ते 10-8-2022 | धम्म पुष्कर - पुष्कर (अजमेर, राजस्थान) |
| 26-10 ते 26-11-2022 | धम्म नागाज्जुन -2 - नागार्जनसागर (तेलंगाना) |
| 28-10 ते 28-11-2022 | धम्मथली - जयपुर (राजस्थान) |
| 11-11 ते 12-12-2022 | धम्म पुष्कर - पुष्कर (अजमेर, राजस्थान) |

### 45-दिवसीय

| | |
|---|---|
| 25-9 ते 10-11-2021 | धम्मतपोवन-2 - इगतपुरी (महाराष्ट्र) |
| 15-10 ते 30-11-2021 | धम्मसुवत्थी - श्रावस्ती (उ. प्र.) |
| 22-10 ते 7-12-2021 | धम्म नागाज्जुन -2 - नागार्जनसागर (तेलंगाना) |
| 2-11 ते 18-12-2021 | धम्मपट्ठान - सोनीपत (हरियाणा) |
| 20-11 ते 5-1-2022 | धम्मवाहिनी - टिटवाला |
| 13-12 ते 28-01-2021 | धम्म नागाज्जुन -2 - नागार्जनसागर (तेलंगाना) |
| 17-12-2021 ते 1-2-2022 | धम्मपाल - भोपाल (म.प्र.) |
| 19-12 ते 3-2-2022 | धम्मतपोवन-1 - इगतपुरी (महाराष्ट्र) |
| 21-12-2021 ते 5-2-2022 | धम्म अम्बिका - दक्षिण गुजरात, गुजरात |
| 1-1 ते 16-2-2022 | धम्मसिन्धु - मांडवी-कच्छ (गुजरात) |
| 6-2 ते 24-3-2022 | धम्मथली - जयपुर (राजस्थान) |
| 9-2-2022 ते 27-3-2022 | धम्मबोधि - बोधगया (बिहार) |
| 26-10 ते 11-12-2022 | धम्म नागाज्जुन -2 - नागार्जनसागर (तेलंगाना) |
| 14-12-22 ते 29-1-2023 | धम्म नागाज्जुन -2 - नागार्जनसागर (तेलंगाना) |

### 60-दिवसीय

| | |
|---|---|
| 12-10 ते 12-12-2021 | धम्मतपोवन-1 - इगतपुरी (महाराष्ट्र) |
| 17-12 ते 16-2-2022 | धम्मतपोवन-2 - इगतपुरी (महाराष्ट्र) |

## धम्मपुण्ण : पुणे शहर(स्वारगेट)

**पुणे विपश्यना समिती,** नेहरु स्टेडियमसमोर, स्वारगेट वॉटर वर्क्सच्या मागे, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दादावाडी, पुणे-411002. फोन: (020) 24436250. Email: info@punna.dhamma.org
